# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/रापानों-२०१६/प्र.क्र.१९/का.११
नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक १ नोव्हेंबर, २०२२

प्रति,
अध्यक्ष,
शहर विकास पक्ष,
व्दारा पंडीतराव परशराम शिंदे,
मानसिंगका बिल्डींग बस स्टॅन्ड रोड,
पाचोरा, ता. पाचोरा, जिल्हा जळगांव, पिन-४२४२०१.

विषय :- राजकीय पक्षाच्या नावातील बदलास मंजूरी देण्याबाबत...
संदर्भ:-१. आपला दि.१७/०७/२०२२ रोजीचा प्रस्ताव
२. क्र.रानिआ/रापनों२०१६/प्र.क्र.१९/का.११,दि.१४/०९/२०२२ ची शासन राजपत्रात प्रसिध्द झालेली अधिसूचना.

महोदय,

राजकीय पक्षाची नोंदणी आदेश, २००९ दि.३१ मार्च, २००९ भाग दोन (९) (दोन) मधील तरतुदीनुसार शहर विकास पक्ष या पक्षाची नोंदणी आयोगाच्या पत्र क्र.रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.१९/का.११, दि.४ नोव्हेंबर,२०१६ अन्वये करण्यात आली होती. आपण पत्र दि.१७ जुले,२०२२ अन्वये **शहर विकास पक्ष** या पक्षाच्या नावात बदल करून त्या ऐवजी पक्षाचे नाव **भारतीय जनाधार पार्टी** असे बदलून त्याची नोंदणी आयोगाकडे करण्याबाबत विनंती केली आहे. याअनुषंगाने पक्षाच्या नावात बदल करण्याबाबत राजकीय पक्ष नोंदणी आदेश, २००९ दि.३१ मार्च, २००९ व दि.१५ फेब्रुवारी, २०२२ च्या आदेशांनुसार उक्त संदर्भ क्र.२ अन्वये अधिसूचना दि.१४ सप्टेंबर,२०२२ रोजी प्रसिध्द करून पक्षाच्या नाव बदलाबाबत सर्वसाधारण जनतेकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या.तथापि, विहित मुदतीत हरकती प्राप्त न झाल्याने, आयोगाच्या उक्त आदेशांतील भाग दोन

३.(१०) (अ) च्या सुधारित तरतुदीनुसार "**शहर विकास पक्ष**" या पक्षाचे नावात "**भारतीय जनाधार पार्टी**" असे बदल करण्यात राज्य निवडणूक आयोगाची मान्यता देण्यात येत आहे.

आदेशानुसार,

आपला,

(अविनाश सणस,)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

प्रत:-१.विभागीय आयुक्त, सर्व विभागीय आयुक्तालय,
२.महानगरपालिका आयुक्त, सर्व महानगरपालिका कार्यालय,
३.जिल्हाधिकारी,सर्व जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
४.मुख्य कार्यकारी अधिकारी,सर्व जिल्हा परिषद कार्यालय,
५.मुख्याधिकारी,नगरपरिषदा/नगरपंचायती,सर्व नगरपरिषदा/नगरपंचायती कार्यालय,
६.राज्य निवडणूक आयेगातील सर्व अधिकारी,
७.निवड नस्ती